जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

21 AUG 2019

तरुण भारत



# नियोजित वेळापत्रकानुसार विद्यापीठ परीक्षा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ अंर्गत होणाऱ्या ऑक्टोबर-नोव्हेंबरच्या परीक्षा नियोजित वेळापत्रकानुसार होणार आहेत. महापुरामुळे दोन आठवडे महाविद्यालये बंद असली तरी आणखी दोन महिन्यानंतर परीक्षा असल्याने अभ्यासक्रम वेळेत पूर्ण करण्याचे आदेश प्राध्यापकांना दिले आहेत. त्यामुळे यापुर्वी जाहीर करण्यात आलेल्या वेळापत्रकानुसार १५ ऑक्टोबरपासून महाविद्यालयीन व विद्यापीठ स्तरावरील सर्व परीक्षा सुरू होणार आहेत, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक जी. आर. पळसे यांनी दिली आहे. शिवाजी विद्यापीठ परिक्षेत्रातील कोल्हापूर, सांगली, सातारा या तीन जिल्ह्यात महापूराने विळखा घातला होता. त्यामुळे जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशानुसार शाळा-महाविद्यालयांना सुटी जाहीर करण्यात आली होती. तिन्ही जिल्ह्यातील दहापेक्षा जास्त महाविद्यालये तर पाण्याखाली होती. परिणामी परीक्षा पुढे ढकलल्या जातील अशी विद्यार्थ्यांची अपेक्षा होती. पण नियोजित वेळात्रकाला आणखी दोन महिने अवधी आहे. त्यामुळे विद्यापीठ व महाविद्यालय स्तरावरील सर्व परीक्षा नियोजित वेळापत्रकानुसार घेण्याची तयारी विद्यापीठाने सुरू केली आहे.

# इंधन क्षमतावर्धन होणार

## शिवाजी विद्यापीठाच्या वतीने दोन कंपन्यांशी सामंजस्य करार

कोल्हापूर टाइम्स टीम

शिवाजी विद्यापीठाच्या रसायनशास्त्र अधिविभागातर्फे फॉर्चुनकोट आणि कझनकॅटसॉल या कंपन्यांसमवेत दोन सामंजस्य करार करण्यात आले. फॉर्चुनकोट ही कंपनी एन्टीमायक्रोबियल पेंट निर्मिती क्षेत्रात तर कझनकॅटसॉल ही साखर कारखान्यांतील बॉयलरमधील इंधनाची क्षमतावर्धनाच्या क्षेत्रात कार्यरत असणारी कंपनी आहे.

सामंजस्य करारावर विद्यापीठाच्या वतीने कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी आणि फॉर्चुनकोट कंपनीच्या वतीने डॉ. संदेश काणेकर यांनी तर कझनकॅटसॉल कंपनीच्या वतीने पंकज देशपांडे यांनी स्वाक्षरी केल्या. शिवाजी विद्यापीठाचे प्रकुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के व मकरंद देशपांडेही उपस्थित होते.



शिवाजी विद्यापीठात फॉर्चुनकोट कंपनीसमवेत सामंजस्य करार करण्यात आला. या प्रसंगी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर व कंपनीचे डॉ. संदेश काणेकर आदी.

फॉर्चुनकोट कंपनीसमवेत झालेल्या सामंजस्य कराराअन्वये शिवाजी विद्यापीठात नॅनोमूलद्रव्ये आधारित मायक्रोबियल पेंट्सची निर्मिती करण्यात येणार असून त्यासाठी महाराष्ट्र सरकारच्या राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान आयोगामार्फत अर्थसाह्य प्राप्त झाले आहे. एन्टीमायक्रोबियल पेंट्स हे नवीन तंत्रज्ञान असून त्यांचा मुख्य उद्देश पेंट्सच्या इतर गुणधर्मांसोबत सूक्ष्म जीवजंतूंचा प्रसार रोखून त्यांना नष्ट करणे असतो. जंतूनाशकास न जुमानणाऱ्या सुपरबग्जच्या निर्मितीसही अटकाव होतो. त्यासंदर्भातील संशोधन विद्यापीठात करण्यात येत आहे, अशी माहिती संशोधक डॉ. एस. डी. डेळेकर यांनी यावेळी दिली.

संशोधक डॉ. डी. एस. भांगे यांनी दिलेल्या माहितीनुसार, कझनकॅटसॉल कंपनीसमवेत झालेल्या सामंजस्य करारान्वये विद्यापीठात साखर कारखान्यांच्या बॉयलरच्या धुराड्यांमध्ये तयार होणाऱ्या काजळीचे प्रमाण कमी करण्याबरोबरच इंधनाची ज्वलनक्षमता वाढविण्यासाठी संशोधन करण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे अशा प्रकारचे उत्प्रेरक तयार करण्यात येणार आहे.

यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर अधिष्ठाता डॉ. पी. एस. पाटील, डॉ. ए. एम. गुरव, इनोव्हेशन व इनक्युबेशन केंद्राचे संचालक डॉ. आर. के. कामत यांनी मनोगत व्यक्त केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
27 AUG 2019
तरुण भारत



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात सोमवारी फॉर्चुनकोट कंपनीसमवेत सामंजस्य करार करण्यात आला. या प्रसंगी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर व कंपनीचे डॉ. संदेश काणेकर. सोबत (डावीकडून) डॉ. के. एम. गरडकर, डॉ. एस. एस. कोळेकर, डॉ. एस. डी. डेळेकर, डॉ. आर. के. कामत, आदी.

# फॉर्चुनकोट, कझनकॅटसॉल कंपनीबरोबर विद्यापीठाचा करार

- सूक्ष्मजंतूनाशक व साखर कारखान्यातील बॉयलरच्या धुराड्यात तयार होणाऱ्या काजळीवर होणार संशोधन

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या रसायनशास्त्र अधिविभागाने फॉर्चुनकोट आणि कझनकॅटसॉल या कंपन्यांसमवेत प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या उपस्थितीत दोन महत्त्वपूर्ण सामंजस्य करार करण्यात आले. फॉर्चुनकोट ही कंपनी एन्टीमायक्रोबियल पेंट निर्मिती क्षेत्रात तर कझनकॅटसॉल ही साखर कारखान्यांतील बॉयलरमधील इंधनाची क्षमतावर्धनाच्या क्षेत्रात कार्यरत आहे.

संशोधक डॉ. एस. डी. डेळेकर म्हणाले, फॉर्चुनकोट कंपनीससवेत झालेल्या सामंजस्य कराराअन्वये जंतूनाशकासंदर्भात संशोधन केले जाईल. विद्यापीठात नॅनोमूलद्रव्ये आधारित मायक्रोबियल पेंट्सची निर्मिती करण्यात येणार आहे. त्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान आयोगामार्फत आर्थिक मदत झाली आहे. एन्टीमायक्रोबियल पेंट्स हे नवीन तंत्रज्ञान पेंट्सच्या इतर गुणधर्मासोबत सूक्ष्म जीवजंतूंचा प्रसार रोखून त्यांना नष्ट करते. जंतूनाशकास न जुमानणाऱ्या सुपरबग्जच्या निर्मितीसही अटकाव होतो. संसर्गजन्य किंवा साथीच्या आजारांना प्रतिबंध होतो.

संशोधक डॉ. डी. एस. भांगे म्हणाले, कझनकॅटसॉल कंपनीसमवेत झालेल्या सामंजस्य करारान्वये विद्यापीठात साखर कारखान्यांच्या बॉयलरच्या धुराड्यांमध्ये तयार होणाऱ्या काजळीचे प्रमाण कमी करण्याबरोबरच इंधनाची ज्वलनक्षमता वाढविण्यासाठी संशोधन करण्यात येणार आहे. त्यामुळे साखर कारखान्यांतून होणाऱ्या प्रदूषणाची पातळी मोठ्या प्रमाणावर कमी होईल आणि इंधनाची ज्वलनक्षमताही वाढेल. सामंजस्य करारावर विद्यापीठाच्या वतीने कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी आणि फॉर्चुनकोट कंपनीच्या वतीने डॉ. संदेश काणेकर यांनी तर कझनकॅटसॉल कंपनीच्या वतीने पंकज देशपांडे यांनी स्वाक्षरी केल्या. यावेळी प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, अधिष्ठाता डॉ. पी. एस. पाटील, डॉ. ए. एम. गुरव, इनोव्हेशन व इनक्युबेशन केंद्राचे संचालक डॉ. आर. के. कामत, कंपनीचे मकरंद देशपांडे आदी उपस्थित होते.

# शिवाजी विद्यापीठाचा फॉर्चुनकोट, कझनकॅटसॉल कंपन्यांसमवेत करार

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. २० : शिवाजी विद्यापीठाच्या रसायनशास्त्र अधिविभागाने आज फॅर्चुनकोट आणि कझनकॅटसॉल या कंपन्यांबरोबर सामंजस्य करार केले. फॉर्चुनकोट ही कंपनी एन्टीमायक्रोबियल पेंट निर्मिती क्षेत्रात तर कझनकॅटसॉल ही साखर कारखान्यांतील बॉयलरमधील इंधनाची क्षमतावर्धनाच्या क्षेत्रात कार्यरत असणारी कंपनी आहे.

सामंजस्य करारान्वये विद्यापीठात साखर कारखान्यांच्या बॉयलरच्या धुराड्यांमध्ये तयार होणाऱ्या काजळीचे प्रमाण कमी करण्याबरोबरच इंधनाची ज्वलनक्षमता वाढविण्यासाठी संशोधन करण्यात येणार आहे.

फॉर्चुनकोट कंपनीसमवेत झालेल्या सामंजस्य कराराअन्वये शिवाजी विद्यापीठात नॅनोमूलद्रव्ये आधारित मायक्रोबियल पेंट्सची निर्मिती करण्यात येणार असून त्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या राजीव गांधी विज्ञान व तंत्रज्ञान आयोगामार्फत अर्थसाह्य प्राप्त झाले आहे. या कंपनीच्या सामंजस्य करारामुळे अनेक संसर्गजन्य किंवा साथीच्या आजारांना प्रतिबंध ठरणाऱ्या घटकांवर होणाऱ्या संशोधनाला गती मिळेल. अशी माहिती संशोधक डॉ. एस.डी. डेळेकर यांनी यावेळी दिली. त्याचप्रमाणे संशोधक डॉ. डी.एस. भांगे यांनी दिलेल्या माहितीनुसार, कझनकॅटसॉल कंपनीसमवेत झालेल्या सामंजस्य करारान्वये विद्यापीठात साखर कारखान्यांच्या बॉयलरच्या धुराड्यांमध्ये तयार होणाऱ्या काजळीचे प्रमाण कमी करण्याबरोबरच इंधनाची ज्वलनक्षमता वाढविण्यासाठी संशोधन करण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे इंधनामध्ये मिसळण्यासाठी अशा प्रकारचे उत्प्रेरक तयार करण्यात येणार आहेत की जेणे करून बॉयलरमधील ज्वलनावेळी नायट्रोजन व सल्फरचे जे विविध प्रकारचे वायू प्रदूषक तयार होतात, त्यांचे प्रमाण कमी होईल. सदरचे दोन्ही संशोधन प्रकल्प आणि सामंजस्य करार हे अत्यंत समाजोपयोगी असल्याचे सांगून प्र-कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के म्हणाले, इंडस्ट्री-इन्स्टिट्यूट इंटरॅक्शनचे हे दोन्ही सामंजस्य करार उत्तम उदाहरण असून विद्यापीठामध्ये सुरू असलेल्या समाजोपयोगी संशोधनाचे प्रतीक आहेत. या दोन्ही करारांमधून अगदी बौद्धिक संपदा हक्क (पेटंट) मिळविण्याइतक्या महत्त्वाच्या संशोधनाची निर्मिती होईल, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला. सामंजस्य करारावर विद्यापीठाच्या वतीने कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी आणि फॉर्चुनकोट कंपनीच्या वतीने डॉ. संदेश काणेकर यांनी तर कझनकॅटसॉल कंपनीच्या वतीने पंकज देशपांडे यांनी स्वाक्षरी केल्या. यावेळी या कंपनीचे मकरंद देशपांडेही उपस्थित होते. यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, अधिष्ठाता डॉ. पी.एस. पाटील, डॉ. ए.एम. गुरव, इनोव्हेशन व इनक्युबेशन केंद्राचे संचालक डॉ. आर.के. कामत हे उपस्थित होते.